Rayat Shikshan Sanstha's,
**Karmaveer Bhaurao Patil Mahavidyalaya, Pandharpur (Autonomous)**
Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
Karmaveer Path, Pandharpur, Dist. Solapur, 413304 (MH)
Phone: (02186) 223104; Email: kbppandharpur@gmail.com;
Website: www.kbpmpandharpur.in
Founder: Padmabhushan Dr. Karmaveer Bhaurao Patil, D. Lit.

---

**Board of Examinations and Evaluation**

Ref. No. KBPM/Exam/ -- /2022-23 Date: 03/07/2023

## सूचना

महाविद्यालयातील बी.ए., बी. कॉम., बी. एस्सी., ई. सी. एस., बी. सी.ए. बी. व्होक. भाग –III **( सेमिस्टर – V व VI)** आणि एम. ए. भाग –II **(सेमिस्टर – III व IV)** वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल २०२३ परीक्षेचा ( मे २०२३ मध्ये घेतलेल्या) निकाल दि. ०३/०७/२०२३ रोजी लागलेला आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी https://kbpmp.rayatedu.in/index.php/login या वेबसाईटवर जाऊन लॉगीन करून निकाल पाहावा.

**निकाल कसा पाहावा?**

१. आपल्या मोबाईलवर अथवा संगणकावर https://kbpmp.rayatedu.in/index.php/login या वेबसाईटला क्लिक करावी / उघडावी.
२. त्यात Student Login ला क्लिक करावे.
३. नंतर Select Course ला क्लिक करावे. त्यात आपल्याशी संबंधित योग्य कोर्स निवडावा.
४. नंतर Registered Mobile Number (जो प्रवेश घेताना दिला होता तो) टाकावा.
५. नंतर Password (जो प्रवेश घेताना विद्यार्थ्यांनी क्रियेट केला होता) तो टाकावा.
६. नंतर Login ला क्लिक करावे.
लॉगीन झाल्यानंतर वर उजव्या बाजूला फोटोसदृश्य आकृतीला क्लिक करून आपलेच नाव येते का ? याची खात्री करावी.
७. डाव्या बाजूला दर्शविलेल्या तीन आडव्या रेषा/मेन्यूला क्लिक केल्यास ड्रॉप डाऊन मध्ये Exam Section ला क्लिक करावे.
८. नंतर Exam Result ला क्लिक करावे. क्लिक केल्यानंतर Offline Exam Result पेज दिसेल.
९. March/April 2023 आणि Academic Year 2022-23 या तपशिलासमोरील View/Download खालील प्रिंटरच्या चित्राला/इमेजला क्लिक करावे. त्यानंतर आपला रीजल्ट डाउनलोड होईल. त्याची प्रिंट काढावी.
१०. डाऊनलोड/प्रिंट नंतर (वर उजव्या बाजूला फोटोसदृश्य आकृतीला क्लिक करून ) Logout व्हावे.

**अत्यंत महत्त्वाची टीप –**

१. युजी ३ या वर्गातील रिपीटर विद्यार्थ्यांचा निकाल सेमिस्टर - ३ व ४ चा निकाल लागल्यानंतर अपडेट होईल. सध्या रिपीटर विद्यार्थ्यांनी सेमिस्टर – ५ व ६ चा निकाल पाहावा.
२. पीजी २ या वर्गातील रिपीटर विद्यार्थ्यांचा निकाल सेमिस्टर - १ व २ चा निकाल लागल्यानंतर अपडेट होईल. सध्या रिपीटर विद्यार्थ्यांनी सेमिस्टर - ३ व ४ चा निकाल पाहावा.
३. निकालाबाबत काही तक्रार असल्यास लेखी अर्जासह सोबत प्रिंट रीजल्ट जोडून तो अर्ज श्री. योगेश मेहडा यांच्याकडे दि. १०/०७/२०२३ पर्यंत जमा करावा. नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. दिलेल्या मुदतीत निकालासंदर्भातील त्रुटीबाबत विद्यार्थ्याने अर्ज न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार असेल. (विद्यार्थ्याच्या अर्जावरील माहिती अपूर्ण असल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.)
४. तक्रार अर्जाबाबत निर्णय होऊन त्याची यादी अर्ज दिल्याच्या दुसऱ्या दिवशी कार्यालयीन वेळेत परीक्षा विभागासमोरील काचफलकात लावली जाईल. त्याबाबत स्वतंत्ररित्या भेटू नये.

५. Login ID आणि Password माहित नसेल तर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून ओळखपत्र व प्रवेश पावती दाखवून महाविद्यालयातील प्रवेश विभागातून दि. १०/०७/२०२३ पर्यंत दु. ३:०० ते ५:०० वा. दरम्यान घ्यावेत. स्वतः विद्यार्थ्यांशिवाय इतर कोणालाही पासवर्ड दिला जाणार नाही.

६. विद्यार्थ्यांनी Login ID आणि Password गोपनीय ठेवावा. इतरांना देऊ नये. त्यामुळे झालेल्या बदलास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

७. विद्यार्थ्यांने आपला निकाल संबंधीत पॅटर्नमध्ये घोषित झाला आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

**उत्तरपत्रिका छायांकित प्रत व फेरतपासणी बाबत सूचना**

ज्यांना उत्तरपत्रिकेची फोटो कॉपी हवी आहे त्यांनी निकाल जाहीर झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आत विहित नमुन्यात अर्ज स्टोअरमधून घेऊन नमूद केलेले शुल्क कॅशियरकडे मुदतीत जमा करावे.

१. फोटो कॉपी मिळाल्यानंतर फेरतपासणी १० दिवसापर्यंत चालू असेल. (परंतू निकाल जाहीर झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आतच फेरतपासणी होईल.)

२. फोटो कॉपी घेतलेल्या पेपरचीच फेरतपासणी करता येईल.

३. जास्तीत जास्त दोन पेपरची फोटो कॉपी मिळेल.

४. फोटो कॉपी मिळालेल्या जास्तीत जास्त दोन पेपरची फेरतपासणी करता येईल.

५. अर्जावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

६. अपूर्ण अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही अथवा संपर्क केला जाणार नाही.

७. एकदा भरलेले शुल्क परत मिळणार नाही.

**फोटो कॉपी आणि फेरतपासणी शुल्क**

१. फोटो कॉपी शुल्क : रु. २००/- (प्रती पेपर)

२. फेरतपासणी शुल्क : रु. ५००/- (प्रती पेपर)

३. गुणपडताळणी शुल्क : रु. ५०/- (प्रती पेपर)

Director
Examinations & Evaluation
K.B.P. Mahavidyalaya,
Pandharpur. (Autonomous)

Karmaveer Bhaurao Patil Mahavidyalaya Pandharpur

PRINCIPAL,
KARMAVEER BHAURAO PATIL
MAHAVIDYALAYA, PANDHARPUR